नियमित दिवाणी दावा क्रमांक ९७/२०११
शिवाजी—वि—शिवशंकर व ईतर

निशानी क्रं. २४ वरील आदेश
( आज दिनांक २५ एप्रील २०१३ रोजी पारित )

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रीया संहीता क्रम ६ नियम १७ नुसार कैफियतेतील दुरुस्तीसाठी दिलेला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार कैफियत देताना काही किरकोळ चुका झालेल्या आहेत. त्याप्रमाणे प्रतिवादी हा कैफियतीच्या पॅरा क्रमांक ५, ६, व ९ मध्ये दुरुस्ती करु ईच्छित आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये अथवा प्रतिवादीच्या बचावामध्ये कोणताही परिणाम होणारा नसुन अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

२. वादीने निशानी ३३ प्रमाणे म्हणणे देऊन अर्जातील कथनांचा ईन्कार केला आहे. वादीच्या कथनानुसाार सर्व्हे नंबर ११६ व १२५ या जमीनीचा मुळ मालक तुकाराम व संभा महार असे होते व त्यांच्यात वाटण्या होऊन ते आपापल्या कब्जेत होते. प्रतिवादी मागणी करीत असलेली दूरुस्ती वस्तुस्थितीच्या विरुध्द असल्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. उपलब्ध कथनानुसार पुढील मुददे उपस्थीत होतात त्यांचे निष्कर्ष कारणासहित खालील प्रमाणे देत आहे.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १ प्रतिवादी मागणी केल्याप्रमाणे दूरुस्तीसाठी पात्र आहेत काय ? | —होकारअर्थी— |
| २. काय आदेश ? | —अंतिम आदेशा प्रमाणे— |

— का र ण मि मं सा —

४. मुददा क्रमांक १ व २ साठी :— प्रतिवादी तर्फे बी.जी. माळी वकीलांनी असा युक्तीवाद केला की अर्ज मुदतीत असुन किरकोळ स्वरुपाच्या

दुरुस्तीसाठी देण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात न्यायचौकशी सुरु झालेली नसल्यामुळे अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली. वादी तर्फे वकीलानी संधी देवुन सुध्दा युक्तीवाद केलेला नाही. उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली. वादीने प्रस्तुतचा दावा कायम मानाई हुकुमासाठी व ७४ आर जमीनीचा कब्जा मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने निशानी २० कडे कैफियत दिलेली आहे. प्रतिवादी मागणी करीत असलेली दूरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत प्रकरणात दिनांक ६—१२—१२ रोजी निशानी २८ प्रमाणे मुददे काढण्यात आलेले आहेत. परंतु आज अखेर वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दिलेले नाही. त्यामुळे दाव्यात न्यायचौकशी सुरु झालेली नाही. अशा परिस्थीतीत प्रतिवादीला कैफियत दुरुस्तीची परवानगी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलटपक्षी पुरावा सुरु होण्यापुर्वी त्याला सुध्दा संधी मिळणार आहे. न्यायाच्या प्रचलित तत्वानुसार दुरुस्तीच्या अर्जाच्या वेळी दाव्यातील गुणदोषाचा विचार होणे योग्य नाही. त्यामुळे प्रतिवादी हा दुरुस्तीसाठी पात्र असल्यामुळे मी मुददा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारअर्थी नोंदवुन मुददा क्रमांक २ साठी पुढील आदेश देत आहे.

आ दे श

१. अर्ज खर्चासहित मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने कैफियतीत दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत ही मुदतीत देण्याचे आहे.

सही/—

दिनांक २५—०४—२०१३.

( एस. व्ही जोशी )
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,लोहारा.